गुरुवार दि.४ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २२३
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

दैनिक लोकनेता बीड
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

# माजी मंत्री एकनाथराव खडसे यांच्या घर वापसी ची चर्चा

## रविवारी रात्री दिल्लीत गेल्याने चर्चेला आलाय उधान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

लोकसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर भाजपाचे माजी मंत्री यांनी रावेर लोकसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्वेसर्वा असलेल्या शरद पवार यांचे कडे उमेदवारी मागणी केली होती. त्यांना जर राष्ट्रवादीची उमेदवारी देण्यात आली तर हा मतदार संघ भाजपाच्या ताब्यातून जाऊ शकतो असा तयार काढून भाजपा पक्ष षष्ठीने दोन वेळा खासदार राहिलेल्या त्यांच्या स्नुशा श्रीमती रक्षा निखिल खडसे यांची पहिल्याच यादीमध्ये उमेदवारीची घोषणा केल्याने खडसे यांना उमेदवारीचा निर्णय बदलावा लागला हे सर्व श्रुत आहे मात्र त्यांनी भाजपा उमेदवारीचा प्रचार करावा अशी भाजपा पक्षश्रेष्ठीची इच्छा असल्याचे बोलल्या जात होते त्यातच एकनाथ खडसे हे दिल्ली येथे गेल्याने त्यांची भाजपा घर वापसी होणार असल्याची चर्चा रावेर लोकसभा मतदार संघात सुरू आहे.

तर अद्याप पर्यंत महाविकास आघाडीच्या उमेदवाराबाबत शिक्का मुहूर्त होऊ शकले नाही व महाविकास आघाडी जवळ कोणताही सक्षम उमेदवार नसल्याने भाजपाच्या विरोधात कोणाला बाईचा बकरा ठरविणार हे येणारा काळच ठरविणार आहे. एकनाथराव खडसे यांच्या भाजपात सिंहाचा वाटा आहे आणि त्यांना खानदेशची मुलुख मैदानी तोफ म्हणून संबोधण्यात येते आजही आपल्या अभ्यासपूर्ण वक्तृत्वाने आणि नागरिकांची कामे



करण्यात त्यांचा हातखंडा असल्याने त्यांची मुक्ताईनगर सह संपूर्ण रावेर लोकसभा मतदार संघासह संपूर्ण जळगाव जिल्ह्यात वर्चस्व व लोकप्रियता आहे महाराष्ट्रातील भाजपा नेत्यांनी त्यांचा गेम केल्याने त्यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा व भाजपाला सोडचिठ्ठी दिली होती मात्र राजकारणात सक्रिय असेले पाहिजे तेव्हाच आपण जनसेवेची कामे करू शकू याचा बोध झाल्याने त्यांनी राष्ट्रवादी प्रवेश घेतला होता परंतु त्यांचा भाजपा प्रति कळवळा असल्याचे स्पष्ट झाले होते त्यांना कित्येक वेळा प्रश्न विचारण्यात येत होता की तुम्ही भाजपामध्ये जाणार का? त्यावेळी त्यांनी भाजपात जाईल त्यावेळी मी सर्वांना सांगून जाईल असे प्रसिद्धी माध्यमांना सांगितले होते.

**भाजपा प्रवेशाचा कोणताही विषय नाही–आ.एकनाथ खडसे**

भाजपा प्रवेशासाठी सध्या स्थितीत कोणत्याही नेत्याशी माझी चर्चा झालेली नाही आणि माझ्याबद्दल होत असलेली चर्चा निराधार आहे मी दिल्ली येथे सुप्रीम कोर्टाच्या कामासंबंधी आलो असून बुधवारी जळगाव जिल्ह्यात परतणार असल्याचे तसेच भाजपा प्रवेशाचा मुद्दा हा इतक्या छोट्या इतर अनेक व्यक्तींशी चर्चा करून निर्णय घ्यावा लागेल असे आमदार एकनाथराव खडसे म्हणाले

---

### हिंगोली जिल्ह्याच्या शासकीय रुग्णालयात

# कोविड पॉझिटिव्ह असलेल्या तिघांनावर उपचार सुरू

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हारण**

हिंगोली येथील शासकीय रुग्णालय सर्दी व खोकला असे असलेले तीन रुग्णांचे स्वॅब नमुने कोविड पॉझिटिव्ह आले असून त्यांना शनिवारी दिनांक ३० मार्च ला त्यांना उपचारासाठी कोविड वार्ड मध्ये दाखल केले आहे याबाबत रुग्णालयाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार हिंगोली शहरातील दोघेजण तसेच बाहेरगाव चा एक व्यक्ती सर्दी व खोकला आधी लक्षणांमुळे उपचारासाठी हिंगोलीच्या शासकीय रुग्णालयात दाखल झाले होते त्यांच्यावर रुग्णालयात प्रशासनाने औषध उपचार सुरू केले मात्र खबरदारीचा उपाय म्हणून त्यांची कोविड चाचणी करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला त्यानुसार त्या तिघांचे स्वॅब नमुने तपासणीसाठी घेण्यात आले सदर नमुन्याची



प्रयोगशाळेमध्ये तपासणी करण्यात आल्यानंतर त्या तिघांचा अहवाल कोविड पॉझिटिव्ह आला असल्याने प्रशासन खरबळून जागे झाले आहे या तीन हि रुग्णांना हलवण्यात आले असून त्यांच्या संपर्कात आलेल्या लोकांचे स्वॅब घेऊ तपासणीला पाठवूअसे जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांनी यावेळी बोलताना सांगितले व सर्वांनी काळजी घ्यावी असे आव्हान जनतेला केले,


---

# राष्ट्रीय महामार्गाच्या कामात अडथळे ठरणारे विद्युत पोल हटवा, नसता आंदोलन–अनिल ढोबळे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी। राजू म्हस्के**

कडा शहरातुन जात असलेल्या साबलखेड ते आष्टी १७ किलोमीटर राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरणाचे काम गेल्या एक वर्षांपासून चालू असून सदर रस्ता रुंदीकरणात विजेचे पोल अडथळे ठरत असून त्याचा त्रास पादचारी, विध्यार्थी व वाहन चालकांना होत आहे. त्यामुळे रुंदीकरणात अडथळा ठरणारे रस्त्याच्या कडेला असणारे वीज खांब हटविण्याची मागणी कड्याचे माजी सरपंच तथा समाजसेवक अनिल तात्या ढोबळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. कडा शहर हे बाजारपेठेच्या दृष्ट्याने खूप मोठी बाजारपेठ व महामार्गावर शैक्षणिक संस्था व महाविद्यालय असून या रस्त्याने विद्यार्थ्यांची वर्दळ जास्त असते,परंतु रस्ता





रुंदीकरणाच्या कामात येथील विद्युत पुरवठा करणारे पोल अडथळा ठरत असल्याने अपघाताची शक्यता नाकारता येत नाही तसेच काही भागात काम सुरू असले तरी काम गतीने पूर्ण होत नाहीत. त्यामुळे महावितरण उपकेंद्र ते टाकळी फाटा यादरम्यान असणारे कडा,टाकळी अमिया वीज पुरवठा करणारे मेन लाईन अडथळाची ठरत आहे.या लाइनचे पोल हटवण्यासाठी ६ फेब्रुवारी रोजी कडा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी १५ दिवसात हे विद्युत पोल हटवण्यात येतील असे आश्वासन महावितरण अधिकाऱ्यांनी दिले होते. मात्र दोन महिने झाले तरी अद्याप हे विद्युत पोल रस्त्यात उभे असल्याने त्याचा वाहतुकीला तर अडथळा निर्माण करीत आहे.त्यामुळे रस्त्यावरील अडथळा निर्माण करीत असलेल्या रस्त्याचे कामही गतीने होत नाही. येत्या आठ दिवसात हे पोल हटवले नाही तर महावितरण कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल.असा इशारा देण्यात आला आहे.

> टाकळी अमिया येथील सबस्टेशनला विद्युत पुरवठा करणारी लाईन ही ३३ केव्ही असल्याने त्यामुळे टप्प्याटप्प्याने पोल शिफ्टिंग करण्याचे काम चालू असून लवकरात लवकर अडथळे निर्माण करणारे विद्युत पोल शिफ्टिंग करून रस्ता मोकळा करण्यात येईल.
>
> **इंजि.एस.बी.देशमुख**
> **उपअभियंता महावितरण आष्टी**

---

# महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांना प्रचंड बहुमताने निवडून आणू - तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**रमेश देशपांडे । मंठा**

महायुतीने राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यात असलेल्या जागेवर रासपचे महादेव जानकर यांना परभणी मतदार संघातून उमेदवारी दिली. महादेव जानकर यांनी मतदार संघामध्ये प्रचाराला सुरुवात केली असून सर्वत्र ते महायुतीच्या नेत्यांना पदाधिकाऱ्यांना भेटी गाठी देत आहेत. दि. २ एप्रिल रोजी त्यांनी शिवसेना मंठा तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. त्यांचे भव्यदिव्य स्वागत शिवसेना मंठा तालुका यांच्या वतीने करण्यात आले. उदयसिंह बोराडे हे तालुकाप्रमुख झाल्यापासून ग्रामीण व शहरी भागात शिवसेना पक्ष वाढवण्यासाठी अतीशय तळमळीने काम करत आहेत. एक वर्षात त्यांनी शेकडो गावात शिवसेनेच्या शाखा



स्थापन करून संघटना मजबूत करण्याचे काम केले या सर्व कामाची माहिती घेऊन जानकर यांनी बोराडे यांचे कौतुक केले.

महायुतीने परभणी मतदार संघासाठी महादेव जानकर यांना उमेदवारी दिली असून त्यांचा राजकारणातील व समाजकारनातील अनुभव आमच्या परभणी मतदारसंघाच्या विकासासाठी भविष्यात नक्कीच उपयोगी पडेल. शिवसेना नेते प्रल्हादराव बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही मनाभावातून महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांचा प्रचार करणार आहोत. प्रचंड बहुमताने त्यांना निवडून आणण्याचा शब्द यावेळी तालुकाप्रमख उदयसिंह बोराडे यांनी दिला.

यावेळी राष्ट्रीय समाज पार्टी प्रदेश सचिव ओमप्रकाश चितेकर, राष्ट्रवादी नेते भाऊसाहेब गोरे, माऊली सरकटे, योगेशराव गणगे, अजिंक्य गोरे, रामराव वरकड, विलासराव राठोड, दिलीपराव हिवाळे, चांद पठाण, दीपक गायकवाड, लिंबाजी बोराडे, विजय चव्हाण, महादेव उकंडे, मदन वैद्य, माऊली वायाळ, भगवान गायकवाड, अमोल विरकर, विनोद खरात, वैजनाथ ढवळे, शुभम उगले, भगवान बोराडे, शुभम शेंडगे, केशव शेंडगे, अंगद मोरे, केसकर सर, गणेश बोराडे, सईद रहीम, महिला आघाडी कासाबाई शिरगुळे, जयश्री पवार, संगीता खराबे, मीरा सरकटे, सरस्वती वाघमारे, रवि भावसार, व सर्व शिवसेना युवा सेना महिला आघाडी मंठा परतूर मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# प्रमोददादा मोरे यांनी पक्ष्यांसाठी ठेवले ज्वारीचे एक एकर क्षेत्र राखीव

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय आबासाहेब मोरे यांनी पाडलेला पायंडा पुढे चालवत,माननीय पद्मभूषण डॉ आण्णासाहेब हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ महाराष्ट्र राज्य चे अध्यक्ष प्रमोददादा मोरे यांनी सुरू केला आहे.संस्था दरवर्षी उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी ,मुठभर अन्न,घोटभर पाणी योजना राबवत आहे.यासाठी मातीची भांडी (परळ) वाटप करतंच असते.. विविध उपक्रम राबवत असते.याचाच एक भाग म्हणून निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ महाराष्ट्र राज्य चे अध्यक्ष प्रमोददादा मोरे यांनी पक्ष्यांसाठी अन्न पाणी सोय म्हणून आपल्या शेतातील एक एकर ज्वारी पिकाची काढणी न करण्याचा उचित निर्णय घेतला.पिक पक्ष्यांना अन्न म्हणून शेतातच



उभे ठेवले आहे..जसे आपण वाचतो बघतो चिमण्यांची शेती हा उपक्रम तसे.पक्ष्यांसाठी मुठभर अन्न व घोटभर पाणी या आपल्या मंडळाचे उपक्रमाची सुरुवात स्वत:पासुन केली आहे.आधी केले मग सांगितले. ही म्हण येथे तंतोतंत लागू पडते.त्यांचे निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ महाराष्ट्र राज्य चे सर्व पदाधिकारी,ग्रामस्थ,विविध पशु पक्षी संस्था राज्यभरातील नागरिक यांचेकडुन कौतुक होत आहे.

---

**झाडे लावा झाडे जगवा**

**चारोळी**

शिकण्याला वय नसावे
काहीतरी नवीन शोधत बसावे
नावीन्याच्या शोधात फसावे
कणभर गवसले तरी हसावे.

रंजना सानप
मायणी (सातारा)

---

# भाजपाचे ज्येष्ठ नेते कमलाकर हरेगावकर यांचे अल्पशा आजाराने निधन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा माजी नगरसेवक कमलाकर (तात्या) हरेगावकर यांचे आज बुधवार दिनांक ३ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले मृत्यू समयी ते ६५ वर्ष वयाचे होते.



गुरुकृपा नगर येथील रहिवासी भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा माजी नगरसेवक कमलाकर सोपानराव हरेगावकर यांचे आज सकाळी आठ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. अत्यंत मनमिळाऊ व सुस्वभावी असल्याने ते सर्व परिचित होते. नगरसेवक पदाच्या कार्यकाळात त्यांनी विविध विकास कामे केली होती. वीरशैव समाजाच्या विविध धार्मिक सामाजिक कार्यात ते नेहमी सक्रिय असत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, जावई, तीन भाऊ, एक बहीण, नातवंडे असा परिवार आहे. कमलाकर हरेगावकर यांच्या पार्थिवावर सायंकाळी सार्वजनिक स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

---



आदर्श व्यक्तिमत्व गुरुवर्य प्रा.शेख इस्माईल सर यांची जालंदर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रायमोहा, ता शिरूर(कासार) च्या प्राचार्य पदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करुन शुभेच्छा देताना. नातेवाईक, मित्र परिवार, आप्तेष्ट, हितचिंतक.(छाया–लोकनेता न्युज नेटवर्क पाटोदा.)

## संपादकीय

# प्रारुपिक इंधनजनक अणुभट्टी

लोकनेता न्यूज नेटवर्क

काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी तमिळनाडूच्या दौऱ्यावर असताना, त्यांनी कल्पाक्कम येथील प्रारुपिक इंधनजनक अणुभट्टीला (पीएफबीआर) भेट दिली. या वेळी त्यांना अणुभट्टीच्या गाभ्यात विखंडन प्रक्रियेचे नियमन करणाऱ्या नियंत्रण छड्या बसविण्याचे प्रात्यक्षिक दूरस्थ पद्धतीने दाखविण्यात आले. अर्थात, प्रत्यक्ष इंधन छड्या ठेवण्याचे कार्य हाती घेण्यास अजून काही काळ जाईल. अणुभट्टीच्या प्रथम शीतक प्रणालीतील सोडियमचे शुद्धीकरण आणि आणीबाणीत इंधनातील उष्णता वाहून नेणाऱ्या प्रणाली आदींच्या चाचण्या अजून बाकी आहेत. ही सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर अणुऊर्जा नियामक मंडळाकडून (एईआरबी) प्रत्यक्ष इंधन छड्या अणुगाभ्यात ठेवण्यास मंजूरी मिळेल.पीएफबीआर म्हणजे 'प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिक्टर' ही यंत्रणा आहे. यामध्ये वापरलेल्या इंधनापेक्षा थोडे जास्त नवीन इंधन तयार होते, त्याचबरोबर ऊर्जा निर्मितीही होते. यामुळेच याच्या अणुगाभ्यात बसविण्यात आलेल्या नियंत्रण छडीचे प्रात्यक्षिक महत्त्वाचे ठरते. ही अणुभट्टी कार्यान्वित झाल्यानंतर, सध्याच्या आण्विक जगातील तिसरी मोठी इंधनजनक अणुभट्टी ठरेल. याआधी रशियामध्ये अशा प्रकारच्या दोन मोठ्या अणुभट्ट्या सुरू आहेत. भारतीय अणुऊर्जा कार्यक्रम तीन स्तरांचा असून, त्याच्या दुसऱ्या टप्प्यात इंधनजनक अणुभट्ट्या प्रस्तावित आहेत. कल्पाक्कम येथे प्रायोगिक तत्त्वावरील पहिली इंधनजनक अणुभट्टी गेली ३० वर्षे कार्यान्वित आहे. प्रस्तुत पीएफबीआर ही ५०० मेगावॉट इतकी मोठी क्षमता असलेली आहे. ती कार्यान्वित झाल्यावर आपल्या अणुऊर्जा कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली, असे म्हणता येईल.भारतात आतापर्यंत बांधलेल्या अणुभट्ट्यांत जड पाणी हे मंदक व शीतक म्हणून वापरले जाते, तर कूडानुकलम येथील दोन्ही अणुभट्ट्या गोड्या पाण्यावर कार्यान्वित आहेत. प्रथम टप्प्यातील अणुभट्ट्यांत तयार झालेले व इंधन फेरप्रक्रियेतून प्राप्त 'प्लुटोनियम' 'युरेनियम'च्या मिश्रणात इंधनजनक अणुभट्टीत वापरतात. यातून ऊर्जा निर्मितीबरोबरच जळालेल्या 'प्लुटोनियम'पेक्षा अधिक 'प्लुटोनियम'ची निर्मिती होते. 'प्लुटोनियम'चे वैशिष्ट्य असे, की त्याच्या अणुविखंडनातून जवळपास तीन न्यूट्रॉन बाहेर टाकले जातात; त्यामुळे किमान एकापेक्षा जास्त न्यूट्रॉन इंधनमिश्रणातील 'युरेनियम २३८'च्या अणूशी संबंध येऊन, त्या अणूचे 'प्लुटोनियम'मध्ये रूपांतर होते. हे साध्य होण्यासाठी अणुभट्टी द्रुतगती न्यूट्रॉनवर कार्यान्वित ठेवावी लागते. ओघानेच अशा अणुभट्टीत जड अथवा गोडे पाणीही वर्ज्य असते. याउलट द्रव सोडियमचे आण्विक आणि भौतिक गुणधर्म अशा इंधनजनक अणुभट्टीसाठी खूप फायदेशीर ठरतात; कारण सोडियमचे अणू न्यूट्रॉनची गती कमी करीत नाहीत; शिवाय त्याची उष्णता वाहकता विपुल आहे. सोडियम धातू १०० अंश सेल्शिअस ते जवळपास ९०० अंश सेल्शिअस तापमानापर्यंत द्रवरूप असतो, हा त्याचा मोठाच फायदा आहे. त्यामुळे द्रवरूप सोडियम अतितप्त, म्हणजे ५५० अंश सेल्शिअसपर्यंत इंधनजनक अणुभट्टीत कुठल्याही दाबाशिवाय वापरता येत असल्याने, तो एक उत्तम शीतक ठरतो.पीएफबीआरची संपूर्ण संरचना व त्याचे बांधकाम देशांतर्गत केले आहे. या अणुभट्टीसाठी लागणारे प्रचंड क्षमतेचे सोडियम पंप ताशी १५,५७० घनमीटर क्षमतेचे असून, त्यांना ३.५ मेगावॉट इतकी मोठी मोटार बसविली आहे. ४०० अंश सेल्शिअस तापमानाच्या सोडियम अभिसरणासाठी लागणारे मेकॅनिकल डिझाइन संपूर्णपणे इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्र (आयजीसीएआर), कल्पाक्कम येथेच विकसित केले आहे.द्रवरूप सोडियम धातू रासायनिक दृष्ट्या हवेशी; तसेच पाण्याशी तीव्र प्रक्रिया करणारा असून, त्याच्या वाहकप्रणाली हवाबंद व स्टेनलेस स्टीलच्या बनवलेल्या असतात. याखेरीज सोडियम असलेल्या मोठ्या पात्रावर किंवा टाकीवर नेहमी आरगॉन वायूचे आच्छादन वापरावे लागते. असे केल्याने सोडियमचा हवेशी संपर्क टाळता येतो. पीएफबीआरची प्राथमिक प्रणाली १२.५ मीटर व्यासाच्या व तितक्याच उंचीच्या प्रचंड वर्तुळाकार पात्रात बंद असते. ही टाकी २५ मिलीमीटर जाडीच्या स्टेनलेस स्टील पत्र्याची बनवली आहे. त्याच्या मध्यभागी अणुभट्टीचा गाभा स्थित आहे. मोदींच्या कल्पाक्कम भेटीदरम्यान याच अणुगाभ्यात पाच मीटर उंचीची नियंत्रण छडी दोन मशिनद्वारे प्रस्थापित करण्यात आली. हे मशिन द्रव सोडियममध्येच कार्यान्वित असते.प्रथम शीतक प्रणालीतून किरणोत्सारी द्रव सोडियमची गळती होऊन तो बाहेर पडू नये, यासाठी मुख्य सोडियम टाकीच्या भोवती ३० सेंटीमीटरची पोकळी ठेवली आहे. ही अतिरिक्त टाकी होते आणि शीतक गळतीचा अपघात टाळता येतो. प्रथम प्रणालीतील शीतकाचे अभिसरण अबाधित राखण्यासाठी दोन्ही पंपांना जनरेटर बॅकअप असून, त्यांखेरीज बॅटरी बॅकअपची सुविधाही आहे. या अणुभट्टीत वाफ जनित्राची सुरक्षितताही खूप महत्त्वाची आहे. जनित्रात पाणी अथवा वाफ वाहून नेणाऱ्या नळ्या 'सीमलेस' बनावटीच्या आहेत. त्या दोन्ही टोकांना जाड पत्र्याशी विशिष्ट वेल्डिंगने जोडलेल्या आहेत. याद्वारे नळ्यांतील दाबयुक्त पाणी अथवा वाफ आणि बाहेरून वाहणारे अतितप्त सोडियम यांचा संपर्क पूर्णपणे टाळला आहे.काही वर्षांपूर्वी अणुऊर्जा विभागाने चार अतिरिक्त एफबीआर अणुभट्ट्या बांधण्यास मान्यता दिली आहे. या सगळ्यांची क्षमता प्रत्येकी ६०० मेगावॉट इतकी असणार आहे. त्यातील एफबीआर एक आणि दोन हे प्रकल्प कल्पाक्कम येथेच उभारण्यात येणार आहे. अन्य दोन अणुभट्ट्या योग्य प्रकल्प स्थळ मिळाल्यावर बांधण्यात येतील. या सर्व इंधनजनक अणुभट्ट्या व्यावसायिक तत्त्वावर बांधल्या जातील. अशा अनेक अणुभट्ट्या बांधल्यावर 'थोरियम'चा वापर करणाऱ्या हायब्रीड अणुभट्ट्या बांधल्या जाण्याची शक्यता आहे. थोरियमचे 'युरेनियम २३३'मध्ये रूपांतर झाल्यास त्याचा उपयोग होईल. हे शक्य होण्यास बराच कालावधी लागेल. 'युरेनियम' किंवा 'प्लुटोनियम'वर आधारित इंधनजनक अणुभट्ट्यांची एकूण क्षमता ३५० हजार मेगावॉट एवढी अनुमानित आहे. ती क्षमता जवळपास १०० वर्षे पुरेल.सध्या कल्पाक्कमच्या पीएफबीआर अणुभट्टीच्या मुख्य शीतक प्रणाली कार्यान्वित झालेल्या असून, प्रथम प्रणालीतील सोडियमचे शुद्धीकरण सुरू आहे. त्याचप्रमाणे आणीबाणीच्या काळात इंधनाचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी विशेष सुरक्षा स्तरावरील शीतक प्रणालीच्या चाचण्या घेणे बाकी आहे. त्यानंतर नियामक मंडळाच्या सर्व अटी पाळून व नियामक मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर मुख्य इंधन भरण्यास सुरुवात होईल.

# राजकारण की राज्यकारण

लोकनेता न्यूज नेटवर्क

राजकारणामध्ये असुन केवळ,सामान्य कार्यकर्ता म्हणुन जगणारे,राजकारण करु पाहणारे आणि शिवरायांना आपला आदर्श मानणारे पण राजकारणाविषयी कधीच उघडपणे भाष्य न करणाऱ्या तरुणांविषयी चला तर मग बोलून पाहूयात.

तरुण म्हटलं की,आपल्या डोळ्यासमोर स्वामी विवेकानंदांचे विचार येतात.स्वामी विवेकानंदांच्या मते,आजचा तरुण कसा असावा? ज्याच्या चेहऱ्यावर तेज आहे, देहामध्ये शक्ती आहे,मनामध्ये उत्साह आणि बुद्धीमध्ये विवेक आहे, मातृभूमीवर ज्याचं प्रेम आहे, इंद्रियांवर ज्याचा संयम आहे,शरीर स्थिर अन आत्मविश्वास दृढ आहे, इच्छाशक्ती प्रबळ आहे, धाडसाचे बळ आहे, सिंहासारखा निर्भय आहे,सत्य ज्याचा ईश्वर आहे,व्यसनापासून तो मुक्त आहे, जीवनामध्ये शिस्त आहे, प्रेमाचा सूर आहे, गुरुजनांचा आधार आहे, पालकांवर ती श्रद्धा आहे, सेवेसाठी तत्पर आहे, चरित्र ज्याचे शुद्ध आहे,स्वामी विवेकानंदांच्या मते तोच आदर्श युवक आहे.

ज्याच्यामध्ये लाथ मारीन, तिथे पाणी काढण्याची ताकद असते त्यांच्या नजरेत स्वराज्यनिर्मितीची महत्वकांक्षा,ज्याच्या वाणीत निडरता,सुस्पटता आणि भविष्याचा वेध घेणारी विचारशिलता असते त्यालाच आदर्श युवक म्हणतात...आज आपण आपल्या देशाची ओळख तरुणांचा देश म्हणून मोठ्या गौरवाने करून देतो, आणि एकीकडे आपल्या प्रेयसीला चलो ले चलो तुमहें तारों के शहर में म्हणारा आजच्या तरुण आणि दूसरीकडे चंद्रयान ३ ची जबाबदारी उत्तमपणे सांभाळणारे 'आजचे तरुण' एकूणच देशात वर्तमान व भविष्य हे या क्षेत्रांमध्ये निश्चित केलं जातं.

आज विविध क्षेत्रात तरुण प्रमुख ठिकाणी काम करतात, परंतु ज्या लोकशाहीच्या मार्गाने आपण तरुणांच्या जिवावर महासत्ता होण्याचे स्वप्न पाहतो तो तरुण राजकारणातच एव्हढा मागे का?हा मोठा यक्ष प्रश्न आहे.आजचा तरुण हा उच्चशिक्षित आहे सोशल मिडिया फेसबुक ,इंस्टाग्राम,ट्विटर, युट्युब च्या अगदी जवळची पिढी आहे.आज आपल्या लोकशाहीमध्ये वयाच्या अठराव्या वर्षी मतदान करून तरुण राजकारणामध्ये सहभागी होत आहेत,तरुणांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वच पिढीही चढाओढीने राजकारणाची मोठी शौकीन आहे.या तरुणांच्या बुद्धीचा कशाप्रकारे फायदा करून घ्यायचा हे राज्यकर्त्यांना नक्कीच कळत असतं.



सुखदेव लोखंडे
( युवा सामाजिक कर्यकर्ता)
मु.पो.पिंपळा,ता.आष्टी,जी. बीड

अशा सत्ताधाऱ्यांकडून आश्वासन आल्यावर तरुण खेचले जातात.अहो छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याचे स्वप्न उराशी बाळगुन ते सत्यामध्ये उतरवलं कारण एकच प्रत्येकाला स्वतःचं आपलं राज्य हे सुस्वराज्य असावं असं वाटत असतं.

परंतु याउलट,आजकालच्या राजकर्त्यांनी लोकांनी लोकांसाठी चालवलेलं राज्य या लोकशाहीची व्याख्याचं बदली की काय असे प्रश्न निर्माण होत आहे.नेते व कार्यकर्ते स्वतःच्या स्वार्थापोटी राज्याची अतोनात लुट करत आहेत.पण याच्यांच मार्गदर्शनाने आजचा तरुण युवक संघटना स्थापन करतो,मित्र मंडळ स्थापन करतो,पण त्याचा उद्देश काय तर,माझं आणि स्वतःच राज्य निर्माण व्हावे.यामध्ये या राजकारणातील अशिक्षितपणामुळे आजच्या तरुणांच्या हातात डिग्री आहे, पण नोकरी नाही.आणि त्यामुळे गावोगावी कित्येक असे तरुण आहेत की बेरोजगारीमुळे वय निघुन चाललय पण विवाह होत नाहीत.आजचा तरुण राजकारणात चळवळीत उतरतोय पण तो कोणासाठी, आणि हि चळवळ का आणि कशासाठी याच्याशी त्याला काही देणघेणं नाही.. आंदोलनाचे मुद्दे त्याला पटो अथवा न पटो पण तरीदेखील त्याच्या हातात आहेत झेंडे आणि त्याच्यात पाठीवर पोलिसांचे दांडे.. नेत्यांचे हेतू कळो अथवा न कळो परंतु त्यांच्या सभांना मी मात्र गर्दी करणार.दंगा भडकवणाऱ्याचे पोर बंगल्यात आणि आणि आजचे कट्टर कार्यकर्ते तरुण मुलं मात्र आज दंगली-दंग्यात आहेत. उच्च शिक्षणासाठी त्यांची पोर विदेशात आणि आमची तरुण मुलं जाती धर्मापायी दंगलीत आहेत.साहेब तुम्ही फक्त लढ म्हणा साहेबांचा कट्टर कार्यकर्ता म्हणून खांद्यावरती असलेला हात आपलं आयुष्य सफल करणार हा समज तरुण पिढीमध्ये निर्माण झालेला दिसून येतोय.

अरे तरुणांनो पाठीवरती शाब्बासकिची थाप आणि पेकाटात लाथ यामध्ये क्वचितच अंतर आहे हे तुम्ही, आम्ही कधी समजून घेणार?

अनेक वेळा प्रश्न पडतो खरंच आजचा तरुण प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे राजकारणामध्ये सहभागी आहे का?

राजकारणातल्या या सध्याच्या रणधुमाळीमध्ये आजच्या तरुणांना प्रत्यक्षपणे रिंगणात उतरण्याची संधी तर सोडा त्यांच्यातलं नेतृत्व कर्तुत्व ओळखून त्यांच्यावरती विश्वास ठेवण्याचे धाडस कोणता राजकीय पक्ष ठेवतो का? ज्या त्या नेत्यांना मंत्र्यांना फक्त आपले मुलं आपला परिवार कसा राजकारणा मध्ये सेटल करता येईल यातच ते व्यस्त आहेत. म्हणजेच आजच्या राज्यकर्त्यांचा विचार केला तर ही घराणेशाही आहे की लोकशाही आहे हाच मोठा प्रश्न पडतो?

आज कालच्या राज्यकर्त्यांचा विचार केला तर आजचे राज्यकर्ते म्हणजेच तरुणांच्या समस्यांवर पोळी भाजून खाणारे आहेत. त्यामध्ये जात,धर्म,पंथ,भाषा, आरक्षण,अनुदान,यांसारख्या भावनां विषयी तरुणांची डोकी भडकावून माथी फोडण्याचा एक उद्योग तरुणांच्या हाती सोपवतात आणि स्वतःला राजकारणातले राजे समजतात.

जगाचं सोडा ओ,आपल्या गावचे राजकारण पहा की, गावच्या ग्रामपंचायतच्या निवडणुकीला आजचा सुशिक्षित युवा तरुण पुढे आला तर लोक म्हणतात बाळा राजकारण आपलं काम नाही गरिबाचं काम नाही तुझ्या करिअर कडे लक्ष दे आपल्या गरिबाचं राजकारणामध्ये काही काम नाही,

'अरे राजकारण म्हणजे पैसे वाल्यांचं काम,राजकारणात गेल्यावर माणूस बिघडतो अशा 'नकारात्मक' भूमिका प्रत्यक्षपणे मांडली जाते.त्यामुळे कित्येक गावांमध्ये आजही सरपंच अंगठे बहादुर आहेत.जिथे सही अंगुठा करा म्हणतील तिथे डोळे झाकून सही अंगुठा करणाऱ्याच्या हातात गाव आहेत.अशा लोकांकडून काय तरुणांनी अपेक्षा ठेवाव्यात.राजकारणी तरुणांबाबत निराशवादी असले तरी आजचा तरुण हा आशावादी आहे.

# महिलेला फेसबुक मैत्रीतून मोहजालात अडकून विनयभंग करणाऱ्या आरोपीस अटक!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोड**

आज च्या काळात स्मार्ट फोन फॅशन झाली असून शोशल मीडियामुळं युवक व युवती व्हाट्स अप, फेसबुक, इंस्टाग्राम, इत्यादी अँप द्वारे फ्रेंड रिक्वेस्ट पाठवू न फोटोला लाईक स्तुती कमेंट करत असतात, प्रोफाइल पाहून मैत्री वाढवत प्रेमाच्या जाळ्यात अडकवणे असे अनेक गंभीर प्रकार पहावयास मिळत आहेत,असाच प्रकार बीड येथील युवक आरोपी, अकबर बबन शेख वय २३वर्ष रा, तेलगाव नाका इंदिरा नगर बीड या महाशयाने परळी येथील राहिवाशी असलेल्या शारदा नगर भागात रहात असलेल्या महिलेच्या घरात कोणी नसलेला फायदा घेत घरात घुसून जबरदस्ती करत हात पकडून मारहाण करत विनयभंग केला असून अकबर बबन शेख यांच्या विरुद्ध परळी सम्भाजीनगर पोलीस ठाण्यात गु, र, नंबर ४६/२०२४कलम ३७६,३५४(डी )४५२,३२३,५०६भा द वी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला पाच दिवसाची पोलीस कष्टडी रवानगी करण्यात आली, या प्रकरणाचा तपास घेत पिंक पथक अंबाजोगाई च्या पोउनी,प्रतिभा एम शेटे, सम्भाजीनगर पोलीस निरीक्षक उस्मान शेख, सपोनि, प्रवीण जाधव, पो अं भगवान गुट्टे, खरटमोल, अंबड,महिला पोलीस कर्मचारी पूनम राठोड यांनी बीड येथून आरोपीचा शोध घेत जेरबंद केले आहे,

मुलीच्या वडिलांना नोकरी मुळे सकाळी घराबाहेर जावे लागते, तर मुलीच्या आई ने मुलीच्या हालचाली मोबाईल नजर कैद करणे काळची गरज

अनेक मुले व मुली ओळख नसतानाही फोटो पाहून फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकार करत असतात, माझे तुझ्यावर खूप प्रेम आहे, तुझ्याशिवाय मी जगू शकत नाही भावुक होऊन भारी नौटंकी करून जवळीकता करत



एकमेकांना घराचा पत्ता देत चकरा मारून प्रेमात वेडा साँग करून बलात्कार विनयभंग करत खून करणं यापर्यंत मजल मारत असतात,

मुलीचा मोबाईल क्रमांक मिळविल्यानंतर भेटी घेणे तसेच तिला महागडे गिफ्ट असे भारी डॉयलॉग मारल्यानंतर भावुक असलेल्या मुली प्रेमांत आखंड बुडतात. अशा मुलींच्या विश्वासाचा गैरफायदा घेऊन मित्राच्या रूमवर किंवा लॉजवर नेऊन बळजबरी शारीरिक संबंध प्रस्थापित करतात. असे युवक शारीरिक संबंधाचे मोबाईलने शूटिंग करणे, अश्लील फोटो काढणे, यासारखे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे मुली कायमच्या जाळ्यात अडकून पडतात.

**मुलींनो... हे करा–**

अनोळखी व्यक्तीची फ्रेंड्स रिक्वेस्ट स्वीकारू नका

कुणाच्याही फोटोवर लाईक किंवा कमेंट करू नका

कुणी कमेंट्स दिली तर लगेच रिक्ट होऊ नका

कुणी उगाच चॅटिंग करीत असेल तर त्याला ब्लॉक करा

वारंवार फोटोवर कमेंट्स करीत असल्यास त्याला अनफ्रेंड करा

फेसबूकवर प्रोफाईल फोटो लॉक करून ठेवा

# युद्धज्वराचे चटके

लोकनेता न्यूज नेटवर्क

इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी रमझानच्या काळात युद्धबंदीस नकार दिला आहे. रक्तपात सुरू राहिला, तर अन्य अरबी राष्ट्रांमध्येही युद्धज्वर पसरण्याची भीती होती. मात्र, इस्रायल आणि हमासनेही हा ठराव धुडकावला आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाने केलेल्या युद्धबंदीच्या ठरावाला केराची टोपली दाखवित इस्रायलने आपला युद्धज्वर कायम असल्याचे दाखवून दिले आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी अनेकदा आलेल्या युद्धबंदीच्या ठरावात आपला नकाराधिकार वापरून इस्रायलला उघड पाठिंबा देणाऱ्या अमेरिकेनेही भूमिका बदलून यंदा आपल्या अनुपस्थितीद्वारे अप्रत्यक्ष पाठिंबा देऊन इस्रायलला एक प्रकारे धक्का दिला. मात्र, त्यानंतरही इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी रमझानच्या काळात युद्धबंदीस नकार दिला आहे.'हमास ने इस्रायलवर केलेला हल्ला निर्घृणच होता; परंतु आता इस्रायल जागतिक पाठिंबा गमावत आहे,' हे अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड



ट्रम्प यांनी केलेले विधान अमेरिकेबरोबरच अन्य देशांचीही मानसिकता स्पष्ट करते. ऑक्टोबरमध्ये हमासने केलेल्या हल्ल्यात बाराशे जणांचा बळी गेला आणि सुमारे अडीचशे जण हमासने ओलिस ठेवले होते. अजूनही त्यापैकी सव्वाशे जण हमासच्या ताब्यात आहेत. प्रत्युत्तरादाखल इस्रायलच्या हल्ल्यांमध्ये आजवर समुरे ३२ हजार पॅलेस्टिनी मारले गेले असून ७५ हजार जण जखमी आहेत. जवळपास २० लाख जण निर्वासित झाले असून यामध्ये अनेक महिला व मुलांचाही समावेश आहे. रमझानच्या काळात युद्धबंदी करण्यात यावी आणि मदतीचा अडलेला ओघ पुन्हा सुरू व्हावा, या आशयाचा ठराव संयुक्त राष्ट्रसंघात मान्य झाला. यापूर्वी अमेरिकेने अशा ठरावांमध्ये नकाराधिकाराचा वापर केला होता. रमझानच्या काळात रक्तपात सुरू राहिला, तर अन्य अरबी राष्ट्रांमध्येही युद्धज्वर पसरण्याची भीती होती. मात्र, इस्रायल आणि हमासनेही हा ठराव धुडकावला आहे. उलटपक्षी नेतान्याहू यांनी आपल्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांची नियोजित अमेरिका भेट रद्द केली आहे. हमासचा पूर्ण नि:पात आणि ओलिसांची सुटका होईपर्यंत युद्धबंदी नाही, अशी भूमिका इस्रायलने कायम ठेवली आहे.यापुढील काळात राफाहच्या दक्षिण भागात हल्ले चढविण्याची त्यांची योजना आहे. या भागात हजारो निर्वासितांनी आश्रय घेतलेला असल्याने हे पाऊल आणखी भीषण रक्तपात घडवू शकते, अशी चिंता अमेरिकेसह साऱ्या जगाला आहे. अमेरिकेच्या या बदललेल्या भूमिकेस नोव्हेंबरमध्ये होऊ घातलेल्या निवडणुकांचाही संदर्भ आहे. या ठरावाच्या निमित्ताने अमेरिका आणि इस्रायल यांचे संबंध कितपत ताणले जाणार, असा प्रश्न आहे. युद्धबंदीसाठी अमेरिका इस्रायलवर दबाव आणणार, की केवळ जाहीरपणे युद्धबंदीचा आग्रह धरीत इस्रायलला मदत सुरूच ठेवणार, हा हमासच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नातच युद्धाचे भवितव्य दडले आहे.

# यावर्षी उष्माघाताची दाट शक्यता उष्णतेची लाट २० दिवस राहणार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

भारतीय हवामानशास्त्र विभागाने (खचऊ) यंदा अधिक उष्मा येण्याची शक्यता वर्तवली आहे. एप्रिल ते जून या तीन महिन्यांपर्यंत तापमान जास्त राहील. या वेळी २० दिवस उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून ती साधारणत: ८ दिवस राहणार आहे.आयएमडीच्या म्हणण्यानुसार, पुढील तीन महिन्यांत देशातील सहा राज्यांमध्ये मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, ओडिशा आणि आंध्र प्रदेशमध्ये उष्णतेचा अधिक प्रभाव जाणवेल. पुढील आठवड्यात तापमान २ ते ५ अंशांनी वाढू शकते.एप्रिल-जून दरम्यान भारताच्या बहुतांश भागात कमाल तापमान सामान्यपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. मैदानी भागांमध्ये उष्णतेची लाट सामान्यपेक्षा जास्त असेल.खचऊ ने सोमवारी सांगितले की तापमानात वाढ झाल्यामुळे काढणीवर आलेल्या गव्हाच्या पिकावर कोणताही परिणाम होणार नाही. आयएमडीचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितले की, सध्या मध्य प्रदेशातील तापमान ३७-४० अंश सेल्सिअसच्या आसपास आहे आणि पुढील आठवड्यात ते ४२ अंशांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. राज्यात गहू काढणीचे ९० टक्के काम पूर्ण झाले असल्याने कोणताही परिणाम होणार नाही. ते म्हणाले की तापमान ३५ अंशांच्या वर गेले तरी पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमध्ये कोणताही परिणाम होणार नाही.गव्हाचे पीक ऑक्टोबरमध्ये पेरले जाते आणि कापणी एप्रिलच्या आसपास सुरू होते. २०२२-२३ मध्ये भारताने १,१०५.५ दशलक्ष टन गव्हाचे उत्पादन झाले. यामध्ये उत्तर प्रदेशचा वाटा ३०.४० टक्के, मध्य प्रदेशचा २०.५६ टक्के, पंजाबचा १५.१८ टक्के, हरियाणाचा ९.८९ टक्के आणि राजस्थानचा ९.६२ टक्के आहे.

भारतात, जेव्हा सपाट भागात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअस किंवा त्याहून अधिक आणि डोंगराळ भागात ते किमान ३० अंश सेल्सिअस किंवा त्याहून अधिक पोहोचते, तेव्हा ही उष्णतेची लाट समजली जाते. याशिवाय सामान्य तापमानापेक्षा ७ अंश सेल्सिअस किंवा त्याहून अधिक वाढ ही तीव्र उष्णतेची लाट मानली जाते.

# उप जिल्हा कार्यकारीअधिकारी म.इ.व.बां.का.क. मंडळ हिंगोली कार्यालयातील भ्रष्टाचार उघडकीस

## मोहसीन सय्यद सहाय्यक कामगार आयुक्त नांदेड,यांच्याकडे पुराव्यासह तक्रार दाखल करुन केली कारवाईची मागणी

## अखिल भारतीय भ्रट्राचार निर्मूलन संघर्ष समितीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पंडितराव तिडके यांनी केली कारवाईची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव । महादेव हरण

अखिल भारतीय भ्रट्राचार निर्मूलन संघर्ष समिती ब्रिक्स ह्युमन राईट्स मिशनचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पंडितराव तिडके यांनी सहायक कामगार आयुक्त मोहसीन सय्यद नांदेड यांची भेट घेऊन चर्चा करून , हिंगोली येथील उप जिल्हा कार्यकारी अधिकारी म.इ.व.बां.का.क.मंडळ कार्यालयातील झालेल्या भ्रष्टाचाराचे पुरावे सादर करून केली कठोर कारवाईची मागणी, हिंगोली कामगार कल्याण नोंदणी लाभार्थ्यांच्या प्रमाणपत्रासहित ग्रामपंचायत निहाय सखोल चौकशी व( दप्तर) तपासणी करून दोषीवर कठोर कारवाई करण्यात यावी कामगार कल्याण नोंदणी कार्यालया अंतगत सन २०१८ ते २०२३ मधिल कालावधीमध्ये केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनेतून लाभ घेतलेल्या सर्व लाभार्थ्यांच्या प्रमाणपत्राची सखोल चौकशी तपासणी व (दप्तर) तपासणी करून कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समर्धित अधिकारी याच नाव व पदनाम सहित तयार करून वरिष्ठां कडे पाठविण्यात यावा

२०१८ ते २०२३ लाभार्थ्यांची कामगार नोंदणी केलेल्या ग्रामपंचायतीच्या रेकॉर्डवरील ग्रामसेवक यांनी दिलेल्या प्रमाणपत्राची सखोल चौकशी विवाहाच्या खर्चाच्या प्रतिकृतीसाठी लाभ घेतलेल्या सर्व लाभार्थ्यांचे प्रथम विवाह नोंदणी प्रमाणपत्र व प्रथम विवाह असल्याचे शपथपत्रासह दिलेल्या सर्व कागदपत्राची सखोल चौकशी मधिल ग्रामपंचायत रेकॉर्ड नोंदीप्रमाणे व कॉन्ट्रॅक्टदाराने प्रमाणित केलेल्या ९० दिवस कामावर असलेल्या प्रमाणपत्रासहित सखोल चौकशी मधिल अति आवश्यक संच पुरवण्यासाठी विविध नमुन्यातील मागणी केलेल्या सर्व कागदपत्रासहित



तपासणी व सखोल चौकशी सुरक्षा संच पुरवण्यासाठी लाभार्थ्यांची गाव निहाय यादी व विविध नमुन्यातील मागणी केलेल्या सर्व कागदपत्राची चौकशी ,मधिल कौशल्य वृद्धीकरण योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची गावनिहाय यादीसह व विविध नमुन्यात मागणी केलेल्या प्रमाणपत्राची सखोल चौकशी वरील विषयी नम्र पूर्वक निवेदन सादर करण्यात येते की कामगार कल्याण विभाग अंतर्गत विविध विभागाद्वारे केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनेचा लाभ घेतलेले लाभार्थी यांनी विविध योजनेतून लाभ घेतलेल्या सर्व लाभार्थ्यांच्या प्रमाणपत्रासहित कागदपत्राची सखोल चौकशी व (दप्तर) तपासणी सक्षम अधिकारीच्या माध्यमातून करावी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध योजनेतून लाभार्थी यांनी बोगस व खोटे प्रमाणपत्र देऊन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला असल्याचे निदर्शनास येत आहे, अनियमित्ता, नियम, शर्ती, अटी, या नियमाचे पालन न करता विविध योजनेच्या माध्यमातून आलेल्या निधीचा गैर मार्गाने अपहर केल्या जात असल्याचे दिसून येते आहे हि अत्यंत गंभीर बाब आहे,

त्यामुळे सन /२०१८ / २०२३ या कालावधीमध्ये लाभ घेतलेल्या सर्व लाभार्थ्यांच्या प्रमाणपत्रासहित कागदपत्राची सखोल चौकशी करून तसा तपासणी अहवाल आपण दिलेल्या मुदतीच्या आत रितसर सादर करावा असे चौकशी प्रत्रात नमुद करण्यात यावे, आपण चौकशीसाठी नेमून दिलेले अधिकारी यांच्या आदेशात नेमुन दिलेल्या ठराविक मुदतीमध्ये सखोल चौकशी व दप्तर तपासणी न केल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची प्रशासकीय कारवाई करण्यात यावी व्यक्तिशः प्रकरणाची नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात घेण्यात घेण्यात यावी,

आपण करत असलेल्या कारवाई व नेमून दिलेल्या संबंधित अधिकाऱ्याचे नाव व पदनाम सहित पत्र अती सिघ्र पोस्टद्वारे वरील कार्यालयाच्या पत्यावर पाठवून द्यावे असी मागणी अखिल भारतीय भ्रट्राचार निर्मूलन संघर्ष समिती ब्रिक्स ह्युमन राईट्स मिशनचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ जिल्हाध्यक्ष हिंगोली पंडितराव तिडके यांनी केले आहे.

# माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान संचलित बालवाडी शिक्षिका वर्गाचा निकाल शंभर टक्के

## सौ.शकीला काझी (खतीब ) ह्या ९२% मिळवून विद्यापीठात प्रथम

लोकनेता न्यूज नेटवर्क

सांगोला । प्रतिनिधी

माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान संचलित कौशल्य विकसन केंद्र येथे सुरू असलेल्या बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर मान्यता प्राप्त बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग गेले सहा महिने सुरू होता नऊ मुलींनी हा प्रशिक्षण वर्ग पूर्ण केला यामध्ये कार्यपद्धती, सिद्धांत, उद्दिष्टे, बालकल्याण, आरोग्य, आहार, बालमानस शास्त्र, हस्तकला असे विषय शिकविण्यात आले यासाठी मार्गदर्शन म्हणून संस्थेच्या कोषाध्यक्ष डॉ. शालिनी कुलकर्णी कौशल्य विभाग प्रमुख, वसुंधरा कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले तसेच उत्कर्ष विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका संजीवनी भोसेकर, विजया खडतरे, सुशीला नांगरे तसेच माजी शिक्षिका सुधामती लोंढे, मंगल पाटणे यांचेही या वर्गासाठी मार्गदर्शन लाभले विषय शिक्षिका म्हणून सुनीता कुलकर्णी, मधुरा शास्त्री, स्वप्ना कुलकर्णी, शालन गयाळी, धनश्री सोनंदकर, विद्या म्हेत्रे यांनी विशेष शिकविले या वर्गात सौ शकीला काझी (खतीब) यांनी ९२ टक्के मिळवून विद्यापीठात प्रथम येण्याचा मान मिळविला.नितल गायकवाड ८६%,



आश्लेषा पाटील ८४%, शीतल क्षीरसागर ८१%, सरस्वती सुतार ८०% ऐश्वर्या पवार ८०%, शुभांगी कांबळे ७२%, स्वाती पवार ७२% रेणुका महामुनी ७० % यांनी या परीक्षेत यश प्राप्त केले आहे त्यांच्या या यशासाठी संस्थेच्या अध्यक्षा संजीवनी केळकर तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकारी यांनी मुलींचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी पैकी दोन विद्यार्थिनींना नोकरी मिळाली आहे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा दुसरा बालवाडी प्रशिक्षण वर्ग सुरू झाला असून तिसरी बॅच मे २०२४ पासून सुरू होणार असून यासाठी केळकर हॉस्पिटल समोरील संस्था कार्यालयात संपर्क करून विद्यार्थिनींनी प्रवेश घ्यावा असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा डॉ. संजीवनी केळकर यांनी केले आहे.


# सोलापुरात अग्निसुरक्षा वाऱ्यावर; गरज २६ अग्निशमन केंद्रांची, प्रत्यक्षात पाचच

लोकनेता न्यूज नेटवर्क

सोलापूर (वृत्तसंस्था)

शहराचा विस्तार दिवसेंदिवस वाढत असून उंच इमारती उभ्या राहत आहेत. त्या तुलनेत महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडे आग आटोक्यात आणण्यासाठी अपुरी साधने व मनुष्यबळाचा अभाव आहे. केंद्र सरकारच्या स्थायी अग्निशमन सल्लागार समितीच्या नियमानुसार २६ अग्निशामक केंद्रांची गरज असताना पाच प्रत्यक्षात पाच केंद्रे अस्तित्वात आहेत. त्यामुळे एका अग्निशमन केंद्रावर अडीच लाख लोकसंख्येचा भार आहे.

शहरात आगीच्या घटना, भिंत पडणे यासह विविध दुर्घटना घडल्यानंतर पहिला कॉल अग्निशामक दलाला केला जातो. महापालिकेच्या अग्निशामक दलाच्या केंद्रांची संख्या केवळ पाच आहे. केंद्र सरकारच्या स्थायी अग्निशमन सल्लागार समितीच्या नियमानुसार शहराची लोकसंख्या आणि हद्दीनुसार



किती अग्निशामक केंद्रे असावीत याचे निकष दिले आहेत.त्यानुसार शहराच्या पहिल्या एक लाख लोकसंख्येसाठी एक, तर त्यापुढील प्रत्येक ५० हजार लोकसंख्येसाठी एक केंद्र असावे. तर दुसऱ्या निकषानुसार १० किलोमीटरच्या हद्दीत एक केंद्र असे नमूद आहे. दाट लोकवस्तीत २० टक्के केंद्राची वाढ आणि धोका असलेल्या भागात आणखी काही केंद्रे उभारण्याचाही निकष आहे. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येच्या निकषानुसार व नागरिकांच्या सोयीसाठी महापालिकेला आणखी किमान २१ केंद्रे उभारावी लागणार आहेत.


# विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरातील व्यवसाय ठप्प

लोकनेता न्यूज नेटवर्क

पंढरपूर (वृत्तसंस्था)

श्री विठ्ठल- रुक्मिणी मंदिराचे जीर्णोद्धार व संवर्धनाचे काम सुरू असल्याने, मागील १५ मार्चपासून श्री विठ्ठल-रुक्मिणीचे पदस्पर्श दर्शन बंद आहे. पदस्पर्श दर्शन बंद असल्याने श्री विठ्ठल दर्शनासाठी पंढरीत येणाऱ्या भाविकांच्या संख्येत कमालीची घट झाली आहे. परिणामी मंदिर परिसरातील विविध व्यवसाय ठप्प झाले असून, त्याचा परिणाम थेट अर्थकारणावर झाला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या निधीतून पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व परिवार देवतांच्या संवर्धनाचे व जीर्णोद्धाराचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. मंदिर संवर्धनाच्या कामासाठी मागील १५ मार्चपासून श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेचे पदस्पर्श दर्शन बंद करण्यात आले असून, पहाटे पाच ते सकाळी ११ या वेळेत केवळ मुखदर्शन सुरू आहे. त्यामुळे भाविकांची संख्या कमालीची रोडावली आहे.त्याचा थेट परिणाम प्रासादिक वस्तू, उदबत्ती, चुरमुरे, बत्तासे, तुळशीहार, फुले, पेढा, मेवा मिठाई यासह इतर साहित्य विक्री करणाऱ्या छोट्या- मोठ्या दुकानदारांच्या व्यवसायावर झाला आहे. श्री विठ्ठल दर्शनासाठी दररोज येणाऱ्या भाविकांच्या संख्येवर व आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री या चार प्रमुख यात्रांवर पंढरपूरचे अर्थकारण अवलंबून आहे.कोरोनानंतर दररोज सुमारे ३० ते ४० हजार भाविकांची पंढरीत गर्दी होत आहे. या भाविकांमुळेच पंढरीतील प्रासादिक वस्तूंची विक्री करणारे छोटे- मोठे व्यावसायिक व लॉज, हॉटेल व्यवसायात मोठी उलाढाल होते. तर टांगेवाले, रिक्षावाले, हारफुलांची विक्री करणारे, पेरू विक्रेते, चंद्रभागा नदीमध्ये होडी चालवणारे कोळी बांधव यांना रोजगार उपलब्ध होतो.मात्र मागील पंधरा दिवसांपासून या रोजगाराला जबर फटका बसला आहे. मंदिर परिसरातील सुमारे अडीचशे ते तीनशे छोट्या- मोठ्या व्यावसायिकांचा व्यवसाय ठप्प झाला आहे. अजून किमान एक महिना तरी पदस्पर्श दर्शन बंद राहणार असल्याने या व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.



# शेकडो मुस्लिम तरुणांना नोकरी देत मुस्लिम समाजाला न्याय दिला-मा.मंत्री हर्षवर्धन पाटील

## जंक्शन येथे हर्षवर्धन पाटील यांच्या उपस्थित इफ्तार पार्टी संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

इंदापूर । बबनराव धायतोंडे

इंदापूर तालुक्यामध्ये गेली ७५ वर्षांपासून हिंदू-मुस्लीम समाज एकोप्याने व बंधुभावाने राहत असून, पिढ्यान-पिढ्या एकमेकांना सुख दुखात साथ देत आहे. इंदापूर तालुक्यातील हिंदू-मुस्लीम एकोपा हा राज्यामध्ये आदर्श आहे. असे गौरोदगार राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी जंक्शन ता. इंदापूर येथे काढले.

जंक्शन येथे नंदिकेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज येथे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या उपस्थितीमध्ये इफ्तार पार्टी उत्साही वातावरणात संपन्न झाली.या इफ्तार पार्टीचे आयोजन कर्मयोगी शंकररावजी पाटील कारखान्याचे संचालक वसंतराव मोहोळकर,कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती रोहित मोहोळकर व मोहोळकर कुटुंबियांनी केले होते. सदर प्रसंगी हर्षवर्धन पाटील बोलत होते.ते पुढे म्हणाले, इंदापूर तालुक्यात सन १९५२ पासून कर्मयोगी शंकररावजी पाटील, राजेंद्रकुमार घोलप, मोहोळकर गुरुजी यांनी सर्व जाती-धर्मांना बरोबर घेऊन राजकारण, समाजकारण करण्याची शिकवण आंम्हा कार्यकर्त्यांना दिली आहे.त्या









जंक्शन येथे मोहोळकर कुटुंबियांच्या वतीने आयोजित इफ्तार पार्टीमध्ये माजी मंत्री हर्षवर्धन पाटील.

शिकवणीनुसार सर्व समाजाला बरोबर घेऊन जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन आपण राजकारण समाजकारण करीत आहोत. कुठलाही धर्म हा प्रथम मानवतेची शिकवण देतो,असे हर्षवर्धन पाटील यांनी स्पष्ट केले.महंमद पैगंबर यांनी इतरांना मदत करा,अशी माणुसकीची शिकवण दिली आहे. कुराण मध्ये सेवा करण्यास महत्त्व दिले आहे.रोजा चा शारीरिक क्षमता सुधारण्यास मदत व्हावी,असा हेतू आहे. सर्वधर्मियांची एकजूट ही समाजाच्या प्रगतीसाठी महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन हर्षवर्धन पाटील यांनी केले.

मुस्लिम धर्मात रमजान महिन्याचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. या काळात अल्लाहकडे घातलेल्या साकड्याचे फळ प्रत्येकाला चांगले मिळते.अल्लाह आपणा सर्वांना निरोगी आरोग्य देवो अशी सदिच्छा व्यक्त करीत,सर्व मुस्लिम बांधवांना रमजान ईदनिमित्त हर्षवर्धन पाटील यांनी याप्रसंगी शुभेच्छा दिल्या.

या इफ्तार पार्टीचे उत्कृष्ट आयोजन केलेबद्दल वसंतआबा मोहोळकर,रोहित मोहोळकर व मोहोळकर कुटुंबियांचे हर्षवर्धन पाटील यांनी आभार व्यक्त केले. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती रोहित मोहोळकर,अजितभाई मुलाणी, बबलू पठाण यांची भाषणे झाली.यावेळी इंदापूर तालुका भाजपचे अध्यक्ष अँड.शरद जामदार, वसंतराव मोहोळकर,प्रदीप पाटील,राजेंद्र गायकवाड,सत्यशील पाटील,अंकुश रणमोडे,उद्धव माने,विजय मचाले,महेश खराडे,दादाभाई मुलाणी, समसूद्दीन मुलाणी,समीरभाई मुलाणी,रसूलभाई पठाण,दत्तात्रय साळुंखे,सुधाकर कणसे,विलास पवार,ऋषिकेश मोहोळकर,नाना गोसावी,श्रीकांत मोहोळकर,सतीश भोसले,इंन्नूसभाई व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुस्लिम समाजाच्या विकासा साठी कटिबद्ध - हर्षवर्धन पाटील

मुस्लिम समाजाच्या विकासासाठी आंम्ही कटिबद्ध असून इंदापूर तालुक्यातील विविध संस्था, विद्यालये या ठिकाणी मुस्लिम समाजाला स्थान दिले आहे तसेच राजकारणातही वेळोवेळी पदे दिली आहेत. मुस्लिम समाजाशी आपले बंधुत्वाचे नाते असल्याचे यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी नमूद केले.

# स्मार्ट अंगणवाडी कागदावरच, डिजिटल शिक्षण, शुद्ध पिण्याच्या पाण्याची वानवा मात्र कंत्राटदार पोसण्यासाठी अनावश्यक खर्च सुरूच-डॉ.ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**







एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडी योजना राबविण्यात येते. ई-लर्निंगची सुविधा,एलईडी टीव्ही, जलशुद्धीकरण यंत्र,युएसबी पोर्टल अशी अद्यावत उपकरणे आणि सुविधांनी सुसज्ज अशी स्मार्ट अंगणवाडी तयार करण्याची राज्य सरकारची योजना आहे मात्र स्मार्ट अंगणवाडी प्रकल्प कागदावरच राहिला असुन कंत्राटदार पोसण्यासाठी मात्र अनावश्यक गोष्टींवर मात्र भरमसाठ खर्च होताना दिसुन येत आहे. त्यामुळे स्मार्ट अंगणवाड्यांवर होणारा खर्च केवळ कंत्राटदार पोसण्यासाठीच आहे का??असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा, महिला व बालकल्याण विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडी योजना राबवली जाते.या योजनेंतर्गत अंगणवाडीतील शुन्य ते सहा वर्ष वयोगटातील बालकांचा भौतिक, शारीरिक आणि सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न करण्याचे ध्येय आहे.या मुलांना पोषणयुक्त आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, आरोग्य शिक्षण, औपचारिक शालेय शिक्षण केंद्रातुन देण्याचा प्रयत्न सुरू आहे.या अंगणवाड्यांची स्थिती सुधारण्यासाठी राज्य सरकारने आदर्श अंगणवाडीची घोषणा केली होती.यातुन प्रत्येक जिल्ह्यातील अंगणवाड्यांना स्मार्ट सुविधा देण्यात येणार आहेत. स्मार्ट अंगणवाड्यांमध्ये वाटर प्युरिफायर,सिलिंग फॅन, ई-लर्निंग साहित्य, अंगणवाडी अंतर्गत व बाह्य रंगकाम, बोलक्या भिंती,छत दुरुस्ती व डागडुजी, दरवाजा व खिडक्या दुरुस्ती, लायब्ररी कपाट आदि सुविधा देण्याचे शासनाचे धोरण आहे.स्मार्ट अंगणवाडीच्या दृष्टीने अत्यावश्यक ई -लर्निंग सुविधा ज्यामध्ये एलईडी टीव्ही तसेच शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय म्हणून लावण्यात आलेले वॉटर प्युरिफायर अंगणवाडी मध्ये वीजपुरवठा नसल्याने केवळ धुळखात पडुन आहेत मात्र कंत्राटदार पोसण्यासाठी अंगणवाडीला एलईडी टीव्ही आणि वॉटर प्युरिफायर याचा पुरवठा करण्यात आला असुन लाईटफिटींग सुद्धा केली आहे मात्र वीजेअभावी शोभेची वस्तू बनुन राहिल्या आहेत. बीड जिल्ह्यातील १३०० अंगणवाड्या स्वतःची इमारतीविना समाज मंदिरात अथवा भाड्याच्या इमारतीत अथवा उघड्यावर भरतात

कुपोषण मुक्तीसाठी काम करणाऱ्या ग्रामीण भागातील अंगणवाड्यांच्या दुरावस्थेचा प्रश्न ऐरणीवर असुन मोडकळीस आलेल्या भिंती आणि पावसाळ्यात गळणारे पत्रे यामुळे चिमुकले, अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या सुरक्षेचा यक्षप्रश्न उभा राहिला असुन प्राथमिक सुविधा नसणा-या बीड जिल्ह्यातील १३०० अंगणवाड्या ईमारतीविनाच समाज मंदिरात अथवा उघड्यावर झाडाखाली भरत आहेत.त्यामुळे संबंधित अंगणवाड्यांची दुरुस्ती आणि पुन:बांधणीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांना प्रत्यक्ष लेखी निवेदनाद्वारे केली होती.त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला होता परंतु अद्याप अंमलबजावणी करण्यात आली नाही.

# अॅड.तात्यासाहेब घुमरे यांच्या जबरदस्त युक्तीवादामुळे एम पी डी ए कायद्याअंतर्गतील आरोपीची निर्दोष मुक्तता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**



अंबाजोगाई येथील सटवा भागवत मेंडके यांच्या वर अपहरण करणे, खुनाचा प्रयत्न करणे, अवैद्य दारूभट्ट्या निर्माण करून दारूची विक्री करणे, दरोडा टाकणे तसेच सुपारी घेणे अशा अनेक गुन्ह्यांसाठी

एम पी डी ए कायद्याअंतर्गत प्रशासनाकडून कारवाई करण्यात आली होती. या मुळे सदरील इसम भागवत मेंडके यांच्या नातेवाईकांनी औरंगाबाद हायकोर्टाचे विधीज्ञ अँड.तात्यासाहेब घुमरे यांच्या कडे या प्रकरणाची केस देण्यात आली. न्यायालयात सरकारी वकील व अँड. तात्यासाहेब घुमरे यांच्या मध्ये जबरदस्त युक्तिवाद झाला या मध्ये अँड.तात्यासाहेब घुमरे यांच्या कायदेशीर युक्तिवादाला यश आले व भागवत मेंडके यांचे स्थानबद्धता उच्च न्यायालय छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने रद्द करून निर्दोष मुक्तता केली. या वेळी पत्रकारशी बोलताना अँड.तात्यासाहेब घुमरे(पवार) म्हणाले की जिल्ह्यातील अट्टल गुन्हेगारांवर वचक बसण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, जिल्हाधिकारी दिपा मुंडे मुधोळ, यांनी अंबाजोगाई येथील अट्टल गुन्हेगार असलेला सटवा भागवत मेंडके याची एम पी डी ए कायद्याअंतर्गत एक वर्षा करीता हर्सूल कारागृह छत्रपती संभाजी नगर येथे स्थानबद्धतेचा आदेश पारित केला होता. या आदेशाला उच्च न्यायालय खंडपीठाचे विधीज्ञ अँड.तात्यासाहेब घुमरे (पवार) यांच्यामार्फत स्थानबद्ध इसमाच्या नातेवाईकांनी स्थान बद्धतेच्या आदेशाला आवाहन दिले होते. स्थानबद्ध इसम सटवा भागवत मेंडके यांच्या वर अपहरण करणे, खुनाचा प्रयत्न करणे, अवैद्य दारूभट्ट्या निर्माण करून दारूची विक्री करणे, दरोडा टाकणे तसेच सुपारी घेणे अशा अनेक गुन्ह्यांसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर,जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे, अंबाजोगाई अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकर, डउझ झख यांनी सटवा भागवत मेंडके या इसमाची स्थानबद्धता बीड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांमध्ये दहशत असल्यामुळे व कोणी तक्रार देण्यास धजावत नसल्यामुळे गंभीर दखल घेत एम पी डी ए कायद्याअंतर्गत हर्सूल कारागृह छत्रपती संभाजी नगर येथे केली होती. सदरील प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती मंगेश पाटील व न्यायमूर्ती शैलेश ब्रम्हे यांच्या न्यायपिठासमोर झाली. युक्तीवादामध्ये घेतलेल्या अनेक मुद्द्यांच्या आधारे स्थानबद्ध इसम सटवा भागवत मेंडके यांचा एम पी डी ए कायद्याअंतर्गत दिलेला स्थानबद्धतेचा आदेश रद्द करून सटवा भागवत मेंडके याची निर्दोष मुक्तता केली.

# लग्न सोहळ्यात मुहूर्तांना ठेंगा ; राजकीय सामाजिक नेत्यांचे स्वागत सत्काराणे गौरव तर वऱ्हाडी मंडळींना किंमतच नाही

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**



लग्न सोहळ्यात उपस्थित असलेल्या प्रतिष्ठित व मान्यवरांचे मग ते राजकीय असो किंवा सामाजिक नेते असो यांचे स्वागत समारंभ करणे ही रूढ होत आहे तर जानवसा येथून मिरवणुकीने निघताना तरुण मंडळीच काय मुली स्त्रिया ही बँड किंवा डीजेच्या तालावर नाचतात आणि वेळेचे भान ठेवत नसल्याने विवाह मुहूर्तावर लागत नाही व लग्नात चांगला उशीरच होतो त्यामुळे लग्नात आवर्जून उपस्थित असलेली वऱ्हाडी वैतागून जातात नवरदेव नवरीच्या मंडळींना या गोष्टीचे काही फायर सुचक नसते म्हणून फक्त आपला बडे गावचा देखावा पाहूत राजकीय सामाजिक प्रतिष्ठेचे ओंगळवाणे चे दर्शन होते अशा गोष्टीवर सामाजिक चिंतन व मनन होणे आवश्यक असल्याची भावना उपस्थित होत आहे.

सुरुवातीला लेवा पाटीदार समाधानी या गोष्टीवर विचार करून त्यांनी लग्नावर बहिष्कार टाकने सुरू केले व त्यानंतर उशिरा लग्न संपन्न करणाऱ्या वर - वधू पित्यावर दंड वसुल करण्याचा पायंडा पाडल्याने या समाजाकडून चांगला प्रतिसाद मिळाला . त्यामुळे जाती-जमातीचे नागरिक लेवा पाटीदार वर वधू पित्यांचा आदर करून उपस्थित राहतात मात्र त्यांचा आदर्श घेत नाही आणि मुहूर्ताची ऐशी तैशी करतात मुला मुलींची पसंती झाल्यानंतर ब्राह्मणाकडून मुहूर्त काढतात आणि त्या मुहूर्तावरच लग्न लागावे असे ठरविले जाते मात्र लग्न पत्रिकेतच राजकीय किंवा सामाजिक प्रतिष्ठिताची नावे टाकली जातात त्यांच्या उपस्थितीच्या आट्टाहसापाई त्या सर्वांची प्रतीक्षा केली जाते आणि वर वधू मंडपात आल्यानंतर त्यांना कळविल्या जाते ही मंडळी प्रतिष्ठते पायी उशीर करतात ते आल्यानंतर वर वधू तिच्याकडून त्यांचा शाल, श्रीफळ, फेटा, व पुष्पहारणे सत्कार करण्यात येतो त्यामुळे उपस्थितांची भर उन्हात दमछाक होते .

एकाच दिवशी अनेक लग्न असतात आणि या लग्नात उपस्थितीची घाई असते त्यामुळे कित्येक नागरिक लग्न सोहळ्याला उपस्थित राहून आहेर भेटवस्तू देऊन निघून जातात व जेवणही करीत नाही विशेष म्हणजे लग्नाला उपस्थित राहण्यासाठी पाहुणेमंडळी व वराडी आलेले असतात मात्र त्यांना कवडीचीही किंमत न देता स्वागत समारंभासाठी उपस्थित प्रतिष्ठतीनाचां महत्व दिल्या जाते आणि मोर्चाची किंमत होत नसल्याने मुहूर्त न काढता व परंपरा आणि रूढीचाही अवलंब न करता आपल्या मुला मुलींची लग्न करावीत असा सूर सर्व जाती धर्माच्या लोकात उमटत आहे.

# पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक विद्यालय आष्टी शाळेचे नवोदय पात्र परीक्षेत सलग दुसऱ्या वर्षी घवघवीत यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



आष्टी येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक विद्यालय चा विद्यार्थी चिन्मय किशोर चहांदे यांची जानेवारीमध्ये झालेल्या नवोदय परीक्षेत नवोदय इयत्ता सहावी प्रवेशासाठी निवड झाली आहे.बीड जिल्ह्याच्या पहिल्याच यादीत निवड झाली तसेच उर्वरित यादीमध्ये आणखी दोन विद्यार्थी या शाळेचे यश संपादित करतील अशी अपेक्षा आहे त्याच्या या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय घुमरे व सर्व शिक्षक यांच्या हस्ते चिन्मय किशोर चहांदे याचा व त्यांच्या आई वडलाचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.आ.भीमराव धोंडे, संचालक डॉ अजयदादा धोंडे, प्रशासन अधिकारी डॉ डी बी राऊत, शिवदास विधाते,माऊली बोडखे, संजय शेंडे,प्राचार्य सुरेश बोडखे,मुख्याध्यापक ज्ञानेश्वर राऊत या सर्वांनी चिन्मय चहांदे चे कौतुक करुन पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

# महायुतीतील विविध पक्षातील छोट्या-मोठ्या चुका दुरुस्त केल्या जातील-चंद्रकांत पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यात २० पक्ष महायुतीत असले तरी सर्वांना लोकसभा निवडणुक लढण्याची संधी मिळू शकली नाही. तीन प्रमुख पक्ष व रासप हे या निवडणुकीत लढत असून त्यांचे जे चिन्ह असेल त्यानुसार सर्व पक्ष महायुतीतील उमेदवारांचा प्रचार करतील. निवडणुकीस आणखी मोठ कालावधी असून विविध पक्षातील छोट्या-मोठ्या चुका दुरुस्त केल्या जातील, असे मत मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी पत्रकारांशी बोलताना चाकण येथे व्यक्त केले. यावेळी माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, भाजप जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील, प्रवक्ते संदीप खर्डेकर उपस्थित होते. शिरुर लोकसभा मतदारसंघाची महायुतीची समन्वय बैठक चाकण येथे पार पडल्यानंतर ते बोलत होते.

# कंधार तालुक्यातील कार्यकर्त्यांकडे भावी खासदारांचे दुर्लक्ष ! कार्यकर्ते पडले संभ्रमात

## अन् मतदारांची अवस्था झाली आधे इधर आधे उधर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



सध्या १८ व्या लोकसभेच्या निवडणुकांचे बिगुल वाजले असून,काही प्रमुख पक्षाने नविन चेहऱ्यांना संधी दिली आहे,तर दिल्लीहुन थेट कंधार व्हाया लातूर जाईल असे जाहीर सभेतून आश्वासन देऊन विसरनाऱ्या चेहऱ्याला परत दुसऱ्यांदा उमेदवारी घोषित केली आहे. निवडणुकीच्या रिंगणातील भावी खासदारांचे स्वप्न पाहणाऱ्या उमेदवार हे मतदारसंघात सगेसोयरे,आपापल्या जाती-धर्मातील मतदाराचे गणित जुळविण्यासाठी राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांना सोबत घेऊन पायाला भिंगरी बांधून फिरत असल्याचे समाज माध्यमातुन पहावयास मिळत आहे.

असे असले तरी कंधार तालुक्यातील कार्यकर्त्यांकडे मात्र भावी खासदारांचे दुर्लक्ष होत असल्यामुळे पुढाऱ्यांचे समर्थन करण्या इतपत कार्यकर्त्यांमध्ये म्हणावा तसा उत्साह दिसून येत नसल्याने येथील कार्यकर्ते संभ्रमात पडले असल्याचे दिसून येत आहे.

गत ३० ते ४० चाळीस वर्षांपूर्वी जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्राच्या राजधानीत कंधार तालुक्याचा दरारा असल्याचे पहावयास मिळत होते,मन्याड खोऱ्यातील ढाण्या वाघाच्या डरकाळीने राज्यातील सत्ताधाऱ्यांना सळो की,पळो करून घाम फोडणारा मतदार संघ म्हणून ओळखला जात होता, कंधार तसा जुना मतदारसंघ जरी असला तरी कंधारचे मतदारसंघाचे महत्त्व कमी करुन लोहा-कंधार मतदारसंघ बनला.तिथुनच कंधार ची सर्वच बाबतीत दैनिय अवस्था झाली हे विशेष.

कंधारला तालुक्याचे व मतदार संघाची फोडा-फोडी करुन अडीच सर्कल मुखेड विधानसभा मतदारसंघात समाविष्ट करण्यात आले तर लोकसभेला आर्धा भाग लातूर लोकसभा मतदारसंघात समाविष्ट करण्यात आला,तर अडीच सर्कल नांदेड लोकसभा मतदारसंघात समाविष्ट करण्यात आले.कंधारची आजची परिस्थिती पाहता आधे इधर और आधे उधर अशी झाल्याचे पहावयास मिळत आहे.

कंधार तालुक्यातील भोळ्याभाबड्या मतदारांचा लातुर लोकसभेच्या खासदारांनी नेहमीच निवडणुकीच्या काळात मतदानसाठीच वापर करून घेतला आहे. गरज सरो वैद मरो..! या म्हणी प्रमाणे मतदान झाले की, मतदाराकडे दुर्लक्ष केले जात आहे.कंधार तालुक्यातील मतदारांनी मला भरभरुन प्रेम दिलं आहे ! हे मी कधीच विसरणार नाही? मी दिल्लीहुन थेट कंधार मार्गे लातूरला जाणार असे नागरिसत्कारच्या भरसभेत येथील मतदारांना आश्वासन देऊन वाऱ्यावर सोडणाऱ्या, विसराळू चेहऱ्याला यावेळी येथील मतदार स्विकारतील का ? असे चौका चौकात चर्चिले जात असल्याचे ऐकावयास मिळत आहे.

आज जरी नामनिर्देशन पत्र दाखल केले नसले तरी उमेदवारी घोषीत होताच प्रचाराचा नारळ फोडून खासदारकीचे गोड स्वप्न पाहणारा उमेदवार आपल्या मतदारसंघातील प्रमुख ठेकेदारांना भेटुन शब्द देत,घेत आहेत.गेल्या काही दिवसांपूर्वी लोहा येथे शिवसेनेच्या ( शिंदे गट )प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी थेट पत्रकार परिषद घेऊन सन्मान दिला जात नसल्याने प्रचारच करणार नसल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे कार्यकर्ते व मतदार संभ्रमात पडल्याचे दिसून येत आहे,

# विविध योजनेतील लाभार्थ्यांच्या मानधनात वाढती महागाई लक्षात घेता वाढ करा-परमेश्वर इंगोले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



सेनगांवसह हिंगोली जिल्ह्यातील विविध योजनेतील लाभार्थ्यांच्या मानधनात वाढती महागाई लक्षात घेता वाढ करण्याची मागणी आज दिनांक ३ एप्रिल वार बुधवार रोजी १ वाजता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे महाराष्ट्र प्रदेश युवक सरचिटणीस परमेश्वर इंगोले यांनी केली. नुकतेच निराधार, वयोवृद्ध, विधवा, दिव्यांग व विविध योजनेतील लाभार्थ्यांचे रखडलेले मागील चार महिन्याचे एकत्रित मानधन लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आले असून वाढती महागाई लक्षात घेता लाभार्थ्यांना ३ हजार रुपये मासिक मानधन देण्याची मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेश युवक सरचिटणीस परमेश्वर इंगोले यांनी केली.

# मा.आ.बच्चूभाऊ कडू यांचा आदेश येईपर्यत आम्ही ठाम राह-उपजिल्हा प्रमुख अजय टप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मलकापूर । प्रतिनिधी**



आम्ही सत्तेसाठी लाचारी पत्कारु शकत नाही! सत्ता काय ? आज येणार उद्या जाणार पण, सत्तेपेक्षा जनहीत आणि जनता जनार्दन यांना सोबती घेवून शेतकरी, निराधार, दिव्यांग,विकलांग वंचित,मागास, शिक्षणाच्या क्षेत्रात होणा-या प्रताडीत होतकरु च्या प्रश्नाला प्रहार जनशक्ती पक्ष व प्रहारचा कार्यकर्ता यांना ज्यास्त महत्त्व देतो,प्रहार सत्तेसाठी राजकारण करित नाही तर जनतेच्या समस्येला वाचा फोडण्यासाठी काम करतो सत्तेत असतांनाही मा.आ.प्रहार जनशक्ती पक्ष संस्थापक बच्चूभाऊ कडू यांनी दिव्यांग कल्याणासाठी मंत्रालयात विभाग समिती उभारणीवर विशेष लक्ष्य देत दिव्यांगाच्या समस्या सोडवल्या सोबत रात्र दिवस मेहनत करुन परिक्षा देणा-या विद्यार्थिचे वेळेवर पेपर फुटी,वाढती परिक्षा फी,पेपर घोटाळा यावर ही स्पष्ट विधाने मा.आ.बच्चूभाऊ कडू यांनी केली.सत्तेसाठी विकला व झुकला जाणार आमचा पक्ष नाही.येत्या लोकसभेत प्रहारचा कार्यकर्ता आपली ताकत दाखवेल कुणाला आणायचं कुणाला पाडायच हे आम्ही जाणतो घटाखालील तालुक्याच बोलायच झालं तर आमचे काम बोलते त्यामूळे पक्षादेश आला की आम्ही आमची भुमिका व कार्य करु असे घटाखालील प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा उपप्रमुख अजय टपतालुका प्रमुख अजित फुंदे, तालुका युवा प्रमुख अमोल बावस्कार, तालुका उपप्रमुख अमोल पाटील,शहर प्रमुख शालिग्राम पाटील, शहर उप प्रमुख बळीराम बावस्कार यांच्या वतीने स्पष्ट विधान केले आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904